ePaper

# 5 लाख कोटींचे करार, दावोस परिषदेत राज्यात विक्रमी गुंतवणुकीची चिन्हे

वर्ष - 8 । अंक -192 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- जोकोव्हिचची चमकदार कामगिरी!
- पदार्पणातच टी-२० मध्ये ५ विकेट्स
- इस्रायल -हमासमध्ये पसरली शांतता
- एक लग्न अन् १७ अंत्यसंस्कार!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 22 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## राज्यात महाविजय मात्र

# आगामी निवडणुकीसाठी 'गुजरात पॅटर्न'?

### जनतेचा कल सर्वेक्षणाच्या माध्यमातून भाजपची चिंता

। नागपूर । महाईन्यूज

**महाराष्ट्रात महायुतीने महाप्रचंड असे बहुमत मिळवले. यानंतर आता महायुतीचा मंत्रिमंडळ विस्तार झाला असून राज्याचा कारभार सुरु झाला आहे. यातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्यात गुंतवणूक आणण्यासाठी दावोस दौऱ्यावर गेले असताना राज्यातील भाजपची संघटना मात्र आगामी आव्हानांसाठी तयारी करताना दिसत आहे. अलीकडेच झालेल्या भाजपच्या शिर्डी अधिवेशनादरम्यान स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी रणशिंग फुंकले. याचदरम्यान त्यांनी पक्षसंघटनेची सूत्र माजी मंत्री रविंद्र चव्हाणांच्या हाती सोपवली. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मे महिन्यात होण्याची शक्यता आहे. यामध्ये राज्यात मोठी असणारी मुंबई महानगरपालिकेचाही समावेश आहे. त्यासाठी महायुती व घटक पक्ष व महाविकास आघाडीचे पक्ष आपली रणनीती आखत आहेत.**



दरम्यान भाजपने आता सध्याच्या लोकप्रतिनिधींबाबत (नगरसेवक) जनतेचा कल सर्वेक्षणाच्या माध्यमातून जाणून घेण्यास सुरुवात केली आहे. अशा स्थितीत नागपूरच्या सर्व्हेतून अनेक नगरसेवकांचे रिपोर्टकार्ड निगेटिव्ह आले आहेत. अशा स्थितीत पक्ष नव्या चेहऱ्यांना संधी देऊन गुजरात पॅटर्न आजमावण्याची शक्यता आहे, त्यामुळेच शिर्डी अधिवेशनात गृहमंत्री अमित शहा यांनी महाराष्ट्रात भाजपला मोठ्या विजयाचे लक्ष्य दिले होते.

नागपूर महापालिका निवडणुकीसाठी भाजपने नुकताच पहिला सर्व्हे केला होता. वृत्तानुसार, या सर्वेक्षणात भाजपच्या ३० ते ४० टक्के नगरसेवकांचे रिपोर्टकार्ड निगेटिव्ह आहेत. या सर्वेक्षणात निगेटिव्ह रिपोर्ट कार्ड असलेल्या नगरसेवकांना डच्चू देणार असल्याचा माहिती असल्याने भाजपच्या अनेक उमेदवारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. निवडणुकीतील चेहरे ठरवण्यापूर्वी भाजप दोन ते तीन सर्वेक्षण आणि सेन्सिंग प्रक्रिया राबवते. यानंतर कोण निवडणूक लढवणार? हे तीन उमेदवारांच्या पॅनेलच्या माध्यमातून ठरवले जाते. तत्पूर्वी नागपुरातील विद्यमान महापौर आणि नगरसेवकांचा कार्यकाळ संपून खूप महिने लोटले आहेत. महापालिकेचा कारभार प्रशासकांकडून चालवला जात आहे.

नागपूर महानगरपालिकेतील एकूण जागा १५१ आहेत. २०१७ च्या निवडणुकीत भाजपने १०८ जागा जिंकत महापालिकेवर झेंडा फडकवला. भाजपच्या जागा ४६ने वाढल्या होत्या. काँग्रेसला २९, बसपला १० आणि शिवसेनेला २ जागा मिळाल्या होत्या. तर राष्ट्रवादी आणि अपक्षांच्या वाटेला केवळ १ जागा आली.

### पहिल्या पाहणीत नगरसेवकांचा निगेटिव्ह अहवाल


मुंबईनंतर ठाणे, पुणे आणि नागपूर ही महाराष्ट्रातील महत्वाची शहरे आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय देखील येथे असल्याने भाजपसाठी हे शहर महत्वाचे आहे. तर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा बालेकिल्ला आहे. यातच फडणवीसांनी महापौर पदाची धुरा देखील सांभाळली आहे. पहिल्या पाहणीत नगरसेवकांचा निगेटिव्ह अहवाल आल्यानंतर नागपूरच्या या फॉर्म्युल्याची चर्चा सुरू झाली आहे.

## खासदार अमोल कोल्हेंनी तिकीट कापले!

### शिवसेना ठाकरे गटाला दुसरा धक्का : माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे यांची "घरवापसी"

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**विधानसभा निवडणुकीपूर्वी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश केलेल्या नेत्याने आयोजित केलेल्या क्रिकेट स्पर्धेत उपमुख्यमंत्री अजित पवारांची चर्चा रंगली आहे, त्याला कारणही तसेच आहे. चिंचवडमधील ठाकरे गटाचे नेते मोरेश्वर भोंडवे यांनी आयोजित केलेल्या स्पर्धेत शिवसेनेच्या नेत्यांऐवजी अजितदादांचे फोटो झळकले आहेत.**




याबाबत प्रसारमाध्यमांनी त्यांना विचारले असता मी अजितदादांसोबतच आहे. विधानसभा निवडणुकीत उमेदवारी मिळावी म्हणून मी अजितदादांना सांगूनच शिवसेनेतून तिकिटासाठी प्रयत्न केला होता. मात्र मी राष्ट्रवादीतच आहे असे सांगत एक प्रकारे मोरेश्वर भोंडवे यांची घरवापसी झाली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

विशेष म्हणजे, विधानसभा निवडणुकीत चिंचवडमधून तिकीट मिळेल, या अपेक्षेने शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला. हातात मशाल घेतली. मात्र, खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी तिकीट राष्ट्रवादी पवार गटाकडे खेचून आणले. त्यामुळे आम्हाला संधी मिळाली नाही. त्यानंतर अजित पवार यांच्या सूचनेप्रमाणे आमदार शंकर जगताप यांचे काम केले, असा धक्कादायक दावा माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे यांनी केला आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघातील अजितदादा पवार यांचे कट्टर समर्थक अशी मोरेश्वर भोंडवे यांची ओळख आहे.

### महापालिका निवडणूक घड्याळाच्या चिन्हावर लढणार

"मी अजितदादांच्या सल्ल्यानेच मशाल हाती घेतली होती. आणि महाविकास आघाडीत राहून महायुतीच्या शंकर जगतापांना आमदार केलं आहे." असा दावा ठाकरेंना जय महाराष्ट्र करीत भोंडवेंनी अजितदादांना अडचणीत आणले आहे. अजितदादांनी मला राष्ट्रवादीत सामावून घेतलंय, त्यामुळं मला पक्षप्रवेशाची गरज नाही. मी आगामी महापालिका निवडणूक घड्याळाच्या चिन्हावर लढणार असल्याचं ही स्वतः भोंडवेंनी जाहीर करून टाकलं आहे.

# स्वारगेट-कात्रज मेट्रो मार्गावर पाच स्थानके?

## प्रस्ताव तयार करण्याबाबत नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सूचना?

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'महामेट्रो'च्या स्वारगेट ते कात्रज या मार्गिकेच्या साडेपाच किलोमीटर अंतरावरील मार्केट यार्ड, पद्मावती व कात्रज या तीन मेट्रो स्थानकांच्या प्रस्तावित भूमिगत मेट्रो मार्गास केंद्र सरकारने हिरवा कंदील दिला आहे. मात्र, बालाजीनगर मेट्रो स्थानकाबाबत कुठलाच निर्णय घेण्यात आलेला नाही.**




त्या पार्श्वभूमीवर बालाजीनगर आणि नव्याने सहकारनगर-बिबवेवाडी या स्थानकाबाबत व्यवहार्यता तपासून पाच स्थानकांबाबतचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सोमवारी पुणे मेट्रो प्रशासनाला केल्या आहेत.दरम्यान, केंद्र सरकारने मंजुरी दिलेल्या मेट्रो मार्गिकेसाठी निविदा प्रक्रिया राबवून कामाला सुरुवात करण्यात येईल, असेही स्पष्ट केले. राज्यमंत्री मिसाळ यांनी पुणे मेट्रो कार्यालयात मेट्रो कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. 'पुणे मेट्रो'चे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, संचालक अतुल गाडगीळ, संचालक विनोदकुमार अग्रवाल, कार्यकारी संचालक हेमंत सोनवणे उपस्थित होते. मिसाळ म्हणाल्या, 'महामेट्रोच्या स्वारगेट ते कात्रज या प्रस्तावित मार्गिकेचे काम हाती घेण्यात आले आहे. नागरिकांच्या आग्रहास्तव या मार्गिकेवर बालाजीनगर (भारती विद्यापीठ समोर) येथील स्थानकाला मंजुरी मिळाली नाही. त्यातच या स्थानकाबरोबर सहकारनगर-बिबवेवाडी या ठिकाणी नागरिकांकडून स्थानकाबाबत मागणी होत आहे. त्या पार्श्वभूमीवर साडेपाच किलोमीटर अंतरात पाच स्थानके होणे शक्य आहे किंवा नाही, यासाठी मेट्रोच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली.

तसेच, याबाबतची व्यवहार्यता, वाढणारा आर्थिक खर्च आदी नियोजनाच्या अनुषंगाने प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना केल्या आहेत.' दरम्यान, वनाझ ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली (विठ्ठलवाडी) या दोन मेट्रो मर्गिकांचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे असून, मंत्रिमंडळाच्या बैठकीत अंतिम मान्यता मिळेल.

### प्रक्रिया राबवून कामाला सुरुवात

केंद्र सरकारने मंजुरी दिलेल्या मेट्रो मार्गिकेसाठी निविदा प्रक्रिया राबवून कामाला सुरुवात करण्यात येईल, असेही स्पष्ट केले. राज्यमंत्री मिसाळ यांनी पुणे मेट्रो कार्यालयात मेट्रो कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. 'पुणे मेट्रो'चे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, संचालक अतुल गाडगीळ, संचालक विनोदकुमार अग्रवाल, कार्यकारी संचालक हेमंत सोनवणे उपस्थित होते. मिसाळ म्हणाल्या, 'महामेट्रोच्या स्वारगेट ते कात्रज या प्रस्तावित मार्गिकेचे काम हाती घेण्यात आले आहे. नागरिकांच्या आग्रहास्तव या मार्गिकेवर बालाजीनगर (भारती विद्यापीठ समोर) येथील स्थानकाला मंजुरी मिळाली नाही. त्यातच या स्थानकाबरोबर सहकारनगर-बिबवेवाडी या ठिकाणी नागरिकांकडून स्थानकाबाबत मागणी होत आहे.

# पुणे महापालिका ॲक्शन मोडमध्ये !

## वाहतूक कोंडीबाबत 'मिसिंग लिंक' प्रोजेक्ट घेतला हाती

। पुणे । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या काही दिवसांपूर्वी एका संस्थेने जगभरातील वाहतूक कोंडीने त्रस्त असलेल्या शहरांची क्रमवारी जाहीर केली होती. या क्रमवारीत पुणे शहराचा वाहतूक कोंडीच्या बाबतीत जगात चौथा तर देशात तिसरा क्रमांक लागला. यामुळे पुण्यातील वाहतूक कोंडी हा विषय किती गहन झाला आहे याची प्रचिती या अहवालावरून समोर येते. आता वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्यासाठी पुणे महापालिका ॲक्शन मोडवर आली असून वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी महापालिकेने मिसिंग लिंक प्रकल्प हाती घेतला आहे.**




महापालिकेकडून शहरातील विकास आराखडा प्रस्तावित केलेले अनेक रस्ते आहेत. मात्र, भूसंपादनाअभावी ते पूर्ण झालेले नाहीत. तसेच अनेक रस्त्यांची कामे अर्धवट असल्याने नागरिकांना याचा मोठा त्रास होत असून लांबून वळसा घालून जावे लागते. यामुळे सहा महिन्यांपूर्वी महापालिकेने राज्य शासनाकडे १० मिसिंग लिंग आणि इतर रस्त्यांसाठी ६३७ कोटी रुपयांची मागणी केली होती. मात्र, राज्य शासनाकडून याबाबत कोणताही प्रतिसाद आलेले नाही. त्यामुळे या रस्त्यांची जोडणी रखडली असून शहरात वाहतूक कोंडीचा त्रास दिवसेंदिवस वाढतच चाललेला आहे. पुणे महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात शहरात एकूण ६७८ मिसिंग लिंग आढळून आलेल्या आहेत. या रस्त्यांची लांबी तब्बल ४५९ किलोमीटर आहे. हे रस्ते पूर्ण झाल्यास शहरातील नागरिकांना सलग १३८४ किलो मीटरचे रस्ते पूर्ण क्षमतेने वापरता येणार आहेत.

### भूसंपादनाअभावी प्रलंबित

मिसिंग लिंक केवळ भूसंपादन न झाल्याने पूर्ण झालेल्या नाहीत. त्यांच्या भूसंपदनासाठी महापालिकेस ८९५ कोटी रूपयांचा खर्च येणार असून, त्यांचे विकसन करण्यासाठी ६२ कोटींचा खर्च येणार आहे. मात्र, हा खर्च महापालिकेस परवडणारा नसल्याने महापालिकेने विशेष बाब म्हणून शासनाकडे मागील सहा महिन्यांत तीन वेळा वेगवेगळ्या प्रस्तावांसाठी निधीची मागणी केली आहे. त्यामध्ये जून २०२४ मध्ये पाच मिसिंग रस्त्यांसाठी १०० कोटींची मागणी केली होती तर, ऑगस्ट २०२४ मध्ये नगरोत्थान योजने अंतर्गत ४१७ कोटींची मागणी केली होती तर ऑक्टोबर २०२४ मध्ये विमानतळ व रेल्वे स्थानकांच्या परिसरातील सात मिसिंग लिंकसाठी १२० कोटींची मागणी केली आहे.

# कारवाईची भीती दाखवून १३ लाखांची फसवणूक!

। पुणे । वृत्तसंस्था : महाईन्यूज

काळ्या पैसे व्यवहारात कारवाईची भीती दाखवून सायबर चोरट्यांनी पाषाण भागातील एका महिलेची १३ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध बाणेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका महिलेने बाणेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला पाषाण भागात राहायला आहेत. सायबर चोरट्यांनी २ जानेवारी रोजी महिलेच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. मुंबई गुन्हे शाखेकडून काळ्या पैसे व्यवहारात कारवाई करण्यात येणार आहे. महिलेच्या बँक खात्याचा वापर व्यवहारांसाठी करण्यात आला असल्याची भीती चोरट्यांनी दाखविली. त्यानंतर याप्रकरणात अटक टाळण्यासाठी (डिजिटल ॲरेस्ट) तातडीने पैसे जमा करावे लागतील, असे सांगून चोरट्यांनी महिलेला एका बँक खात्यात पैसे जमा करण्यास सांगितले. त्यानुसार महिलेने चोरट्यांच्या खात्यात १३ लाख २३ हजार रुपये जमा केले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नवनाथ जगताप तपास करत आहेत.

पाषाण भागातील आणखी एकाची सायबर चोरट्यांनी फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सायबर चोरट्यांनी तक्रारदाराला शेअर बाजारात गुंतवणुकीचे आमिष दाखवून १७ लाख ३२ हजार रुपयांची फसवणूक केली. याबाबत एकाने बाणेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चोरट्यांनी त्यांना गेल्या वर्षी मोबाइल क्रमांकावर संदेश पाठविला होता. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष चोरट्यांनी त्यांना दाखविले होते. सुरुवातीला तक्रारदाराने रक्कम गुंतविली. त्यानंतर चोरट्यांनी त्यांना परतावा दिला. परतावा मिळाल्याने तक्रारदाराने आणखी रक्कम गुंतविली.


## पिंपरी चिंचवड महापालिकेचा प्रायोगिक तत्त्वावर प्रकल्प

# शाळांसाठी सुरक्षित रस्ते!

## अपघातांची संख्या कमी करण्यासाठी निगडीतील शाळेभोवती रस्त्यांची पुनर्रचना

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेचा शिक्षण विभाग विद्यार्थी सुरक्षेसाठी विविध उपक्रम राबवत आहे. विद्यार्थ्यांना उत्तम पायाभूत सुविधा मिळाव्यात आणि शाळेचा परिसर सुरक्षित रहावा, यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका आणि ग्लोबल डिझायनिंग सिटीज इनिशिएटिव्ह यांचा संयुक्त उपक्रम सुरू आहे. विद्यार्थ्यांची सुरक्षितता केंद्रस्थानी ठेवून या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.**





पिंपरी चिंचवड महापालिकेने निगडी परिसरातील ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय या शाळेच्या आजुबाजुचे सार्वजनिक रस्त्यांची पुनर्रचना करण्यासाठी सात दिवसांचा प्रायोगिक प्रकल्प सुरू केला आहे. २० जानेवारी २०२५ पासून या प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यासाठी सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देणे, हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

ब्लूमबर्ग फिलान्थ्रॉपीज इनिशिएटिव्ह फॉर ग्लोबल रोड सेफ्टी आणि ग्लोबल डिझायनिंग सिटीज इनिशिएटिव्ह यांच्या सहकार्याने महापालिका रस्त्यांच्या रचनेत सुधारणा केली जात आहे. शाळेमध्ये पायी तसेच सायकलने येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा प्रकल्प अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या अंतर्गत शाळा परिसरातील वाहतुकीची गती नियंत्रित करून अपघात कमी होण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. प्रकल्पांतर्गत करण्यात येणाऱ्या प्रस्तावित सुधारणांमध्ये पादचाऱ्यांना सुरक्षित रस्ता ओलांडणे शक्य व्हावे, वाहन वेग मर्यादा, विस्तारित फूटपाथ, आणि सायकल मार्ग यांचा समावेश आहे.

या प्रकल्पाच्या सात दिवसांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर पिंपरी चिंचवड महपालिका आणि ग्लोबल डिझायनिंग सिटीज इनिशिएटिव्ह या पुनर्रचनेचा प्रभाव समजून घेण्यासाठी मूल्यमापन करतील. यामध्ये रस्त्यांच्या स्थितीचा माहिती संकलित केली जाईल. त्यानुसार सुधारणा आणि वाहनांच्या वेगाबाबत अंदाज लावणे शक्य होईल.

> 3विद्यार्थ्यांच्या प्रवासाला सुरक्षितता आणि सोयिस्करता प्रदान करणे, हे महापालिकेचे प्राधान्य आहे. हा प्रकल्प इतर शाळांमध्येही मार्गदर्शक ठरेल आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत सहाय्यभूत ठरेल. या प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांचा प्रवास सुरक्षित आणि आनंदायक बनवण्यावर लक्ष केंद्रित करणारा आहे.
>
> – **शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका

### शाळांभोवतीचा परिसर होणार अधिक सुरक्षित..

ज्ञान प्रबोधिनी विद्यालयाच्या दोन हजार विद्यार्थ्यांसाठी महापालिकेने परिसरातील रस्त्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्याचा उपक्रम सुरू केला आहे. यामध्ये ३० टक्के विद्यार्थी पायी किंवा सायकलने शाळेत येत असल्याने, त्यांच्या सुरक्षेसाठी विशेष उपाय केले जात आहेत. पाच हजार चौ.मी. क्षेत्र पादचाऱ्यांसाठी सुरक्षित व वाहनमुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच वाहतुकीचा वेग २० किमी/प्रतीतास नियंत्रित करण्यात येणार आहे. महापालिकेच्या या प्रयत्नामुळे शाळांभोवतीचा परिसर अधिक सुरक्षित होईल, आणि हा प्रकल्प शहरातील इतर शाळांसाठी प्रेरणादायी ठरेल.

### विद्यार्थ्यांचा घेतला अभिप्राय..

शाळेच्या आजुबाजुच्या सार्वजनिक रस्त्यांची पुनर्रचना करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका आणि ग्लोबल डिझायनिंग सिटीज इनिशिएटिव्ह यांनी विद्यार्थी, परिसरातील नागरिक, शिक्षक यांच्याशी संवाद साधत त्यांना शाळेत ये-जा करताना येणाऱ्या अडचणी, रस्त्याबाबत त्यांच्या असणाऱ्या अपेक्षा समजून घेतल्या. यामध्ये रस्ता ओलांडताना येणाऱ्या अडचणी, पार्किंग, अतिक्रमणे, पायाभूत सुविधा आणि शाळेच्या परिसरातील वाहतूक अंमलबजावणी अशा विविध मुद्यांवर संवाद साधण्यात आला. त्यामुळे विद्यार्थ्यांना वाहतुकीशी संबंधित अनेक समस्यांचा सामना करावा लागत असल्याचे लक्षात आले. परिसरातील नागरिक, विद्यार्थी, शिक्षक यांचा अभिप्राय लक्षात घेऊन सदर प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात आला.

> शाळेतील विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात येणाऱ्या प्रकल्पाचा सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होईल. विद्यार्थ्यांचा प्रवास कशा पद्धतीने सुरक्षित करता येऊ शकतो, याचा अभ्यास प्रकल्पांतर्गत करण्यात येणार आहे.
>
> **–जशवंत तेज कासला,**
> प्रकल्प अधिकारी, ग्लोबल डिझायनिंग सिटीज इनिशिएटिव्ह

---

## माथाडी कामगार व टाटा ग्रुप ऑफ कंपनी व्यवस्थापनात वेतन करार!

## कामगार नेते इरफान सय्यद यांची यशस्वी शिष्टाई; व्यवस्थापनाचे मानले आभार

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिवसेना प्रणित महाराष्ट्र मजदुर संघटना आणि महाराष्ट्र राज्य माथाडी कामगार सल्लागार समिती सदस्य, तथा शिवसेना उपनेते इरफान सय्यद यांच्या प्रयत्नातून पिंपरी चिंचवड, पुणे शहरातील टाटा ग्रुप ऑफ कंपनीजच्या युनिट्समध्ये काम करणाऱ्या माथाडी कामगारांचा वेतन वाढ करार नुकताच करण्यात आला.**



शिवसेना उपनेते इरफान सय्यद यांच्या प्रयत्नातून पिंपरी चिंचवड, पुणे शहरातील टाटा ग्रुप ऑफ कंपनीजच्या युनिट्समध्ये काम करणाऱ्या माथाडी कामगारांना 5 हजार 250 रुपयांची घसघशीत पगारवाढ लागू करण्यात आली. वेतनात भरघोस वाढ झाल्यामुळे कामगारांनी इरफान सय्यद यांचा युनियनच्या कार्यालयात सत्कार केला. कार्याध्यक्ष परेश मोरे, उपाध्यक्ष भिवाजी वाटेकर, जनरल सेक्रेटरी प्रवीण जाधव, संघटक प्रदीप धामणकर , मातोश्री माथाडी कामगार सहकारी पतसंस्थेचे चेअरमन पांडुरंग कदम, रायरेश्वर माथाडी कामगार सहकारी पतसंस्थेचे चेअरमन सतीश कंठाळे, गोरक्ष दुबाले, श्रीकांत मोरे, बबन काळे, सुनील सावळे, अशोक साळुंके, नागेश व्हनवटे, समर्थ नायकवडे, विश्वनाथ गांगड, अमित पासलकर, रत्नाकर भोजणे, गणेश नाईकवाडे, आयुष शिंदे तसेच माथाडी मंडळातील टाटा ऑटो कॅम्प सिस्टीम लिमिटेड चिंचवड मुकादम केशव रासकर, मुकादम गिरीश देशमुख, विजय खंडागळे, टी एम ऑटोमॅटिक सिस्टीम चिंचवड मुकादम गणेश पिंपरे, टॅको हॅन्ड्रीक्सन चाकण, मुकादम सचिन नाळे, माथाडी कामगार व संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> कामगार व उद्योजक हे एकमेकांवर अवलंबून असतात. दोघांमधील चर्चेने विषय सोडविण्याचे काम संघटना करीत असते . यापुढील काळातही कामगार व प्रशासनाने बरोबर राहून कंपनीचे व कामगारांचे हित जपावे. महाराष्ट्र मजूर संघटना ही हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विचार व प्रेरणा घेऊन निर्माण झालेली संघटना आहे. कामगार हिताचे बाळकडू प्यायलेली ही संघटना केवळ कामगारांचे हित जपण्यातच धन्यता मानते. त्यामुळे कष्टकरी कामगार हे संघटनेकडे आपलेपणाने पाहतात.
>
> **–इरफान सय्यद,** उपनेते, शिवसेना.

# ‘समाजवादी, धर्मनिरपेक्ष’ की ‘पंथ’निरपेक्ष?



## भूमिका

**आपल्या संविधानाचे सार सांगणाऱ्या प्रास्ताविकेची सुरुवात ‘आम्ही, भारताचे लोक, भारताचे सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा ...(निर्धार करतो)’ अशी आहे. यापैकी केवळ ‘आणीबाणीच्या कालखंडात घुसडले गेलेले शब्द’ म्हणून ‘समाजवादी’ आणि ‘धर्मनिरपेक्ष’ या शब्दांचा दुस्वास करणाऱ्यांची संख्या मोठी आहे.**

विशेषत: प्रास्ताविकेच्या अखेरीस भारताच्या लोकांनी हे संविधान अंगीकृत, अधिनियमित आणि स्वत:ला अर्पण करण्याची तारीख – २६ नोव्हेंबर १९४९ – स्पष्टपणे नमूद असल्याने त्यानंतरचा बदल अवैधच ठरवायला हवा, असे काहीजणांचे म्हणणे असते. साक्षात नानी पालखीवालांसारख्या विधिज्ञांच्या युक्तिवादानंतरही हे शब्द कायम राहिल्याची खदखदही अनेकांमध्ये असते. या दुस्वासाला, खदखदीला आणि त्यामागच्या आक्षेपांना वाट देणाऱ्या तीन याचिका २०२० पासून सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित होत्या, त्या न्यायालयाने फेटाळल्या. म्हणजे हे शब्द यापुढेही कायमच राहतील, असे न्यायालयाने बजावले आहे. बहुतेक राज्यांच्या विधानसभा बरखास्त असताना (आणीबाणीमध्ये) संसदेत ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे हे शब्द प्रास्ताविकेत समाविष्ट झाले, हे खरे. पण त्यानंतरच्या ‘जनता पक्ष’ सरकारने ४२ व्या घटनादुरुस्तीला



निष्प्रभ करण्यासाठी जी ‘४५ वी घटनादुरुस्ती’ मांडली, तिच्यावरील चर्चेअंती हे शब्द कायम ठेवण्याचा निर्णय जनता सरकारनेही घेतला, हा इतिहास सर्वोच्च न्यायालयाने सांगितला, हे बरे झाले. ‘भारतीय संदर्भात समाजवादाचा अर्थ ‘कल्याणकारी राज्य’ इतकाच आहे’ आणि ‘धर्मनिरपेक्षता हा संविधानाच्या पायाभूत चौकटीचा भाग असल्याचे मत सर्वोच्च न्यायालयाने केशवानंद भारती (१९७३), एस. आर. बोम्मई (१९९४) या प्रकरणांच्या निकालांत, तसेच त्यानंतरही वेळोवेळी व्यक्त केलेले आहे. भारतीय संदर्भात धर्मनिरपेक्षता या संकल्पनेची व्याप्ती फार मोठी आहे- राज्ययंत्रणा कोणत्याही एका धर्माची नाही, पण सर्व नागरिकांना आपापला धर्म आचरण्याचे आणि त्याचा प्रसार करण्याचेही स्वातंत्र्य आहे’ — हेसुद्धा न्यायालयाने स्पष्ट केले. इतक्या साधार विवेचनानंतर यापुढे तरी कुणी प्रास्ताविकेत ‘धर्मनिरपेक्षता घुसवल्या’ची तणतण करणार नाही, ही अपेक्षा प्रशस्त झाली आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्या. संजय कुमार यांनी २५ नोव्हेंबरला- म्हणजे संविधान दिनाच्या पूर्वसंध्येला प्रास्ताविकेचे मूल्य-भान विशद केले, हे योग्यच झाले. पण न्यायपालिकेलाही न जुमानता जे राजकारण करू इच्छितात, त्यांचे काय करायचे हा प्रश्न यापुढेही बहुधा कायम राहील. याचे प्रत्यंतर लगेच मंगळवारी आले.भारतीय संविधानाचा अमृतमहोत्सवी सोहळा राष्ट्रपतींच्या भाषणाने जुन्या संसद भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात मंगळवारी पार पडला. राष्ट्रपतींनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे जाहीर वाचन साऱ्या सभाजनांकडून करवून घेतले. पण प्रास्ताविकेतील ‘धर्मनिरपेक्ष’ या शब्दाऐवजी महामहीम राष्ट्रपतींनी ‘पंथ...’ असा उच्चार केल्याचे स्पष्ट ऐकू आले! या वेळच्या भाषणात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ‘नागरिकांची मूलभूत कर्तव्ये’ यावरही भर दिला. ‘मूलभूत कर्तव्ये’ (विभाग ४ अ, अनुच्छेद ५१ अ) हा भागसुद्धा आणीबाणीतल्या ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारेच संविधानात समाविष्ट झाला होता; परंतु खरे आश्चर्य ‘पंथ’ या शब्दाचे- कारण त्या शब्दामागचा राजकारणाचा आणि वादग्रस्त इतिहास फार जुना नाही! २६ नोव्हेंबर हा दिवस दरवर्षी ‘संविधान दिन’ म्हणून पाळण्याचा, त्यासाठी संसदेतही खास सोहळे करण्याचा निर्णय मात्र २०१५ पासून भाजपच्या सरकारने अमलात आणला. त्यासाठी २०१५ मध्ये तर, दोन दिवसांचे खास अधिवेशनही झाले होते. नेमके याच अधिवेशनात ज्येष्ठ भाजपनेते आणि केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांनी ‘प्रास्ताविकेत ‘समाजवादी’ आणि ‘सेक्युलर’ हे शब्द नंतर घुसडले गेलेले आहेत.’२०१५ च्या त्या अधिवेशनातच, तेव्हा काँग्रेसचे अध्यक्ष नसलेल्या मल्लिकार्जुन खरगे यांनी सिंह यांना प्रत्युत्तरही दिले होते, पण ‘मीडिया’ने लोकांपर्यंत चोखपणे पोहोचवली ती, सिंह यांची ‘सेक्युलर’ या शब्दावरची नाराजी. या शब्दाचा हिंदी अर्थ ‘पंथनिरपेक्षता’ असल्याचेही राजनाथ सिंह म्हणत होते.

## प्रासंगिक »

### ‘एनजीओ’गिरी सोडा


***राहुल गांधी ते नाना पटोले यांच्या वर्तनाने काँग्रेसची पडझड झालीच; त्याहीपेक्षा भाजपच्या लोकसभेतील पीछेहाटीलाच आपला विजय मानणे नडले...***

विधानसभा निवडणुकांत शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना या पक्षांचे मोठे नुकसान संख्यात्मकदृष्ट्या झाले. काँग्रेसचे तसे नाही. संख्यात्मक आणि गुणात्मक अशा दोन्ही पातळ्यांवर त्या पक्षाची कामगिरी निराशाजनक झाली. संख्येत तर त्या पक्षाने मार खाल्लाच. पण त्याच वेळी पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात, यशोमती ठाकूर आदी ज्येष्ठ, अनुभवी आणि अभ्यासू काँग्रेस नेत्यांस या निवडणुकीत पराभव चाखावा लागला. अवघ्या चार महिन्यांपूर्वी झालेल्या निवडणुकांत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना यांच्या ‘महाविकास आघाडी’ने घवघवीत यश नोंदवले. त्या वेळी भाजप, अजितदादांची राष्ट्रवादी आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना यांच्या सत्ताधारी महायुतीपेक्षा विरोधकांच्या महाविकास आघाडीचा विजय दर लक्षणीय होता.

जनता पक्षाच्या आघाडीचे सरकार १९७७ साली अस्तित्वात आले. इंदिरा गांधींच्या काँग्रेसला त्यांनी मोठा शह दिला; मात्र पूर्ण पाच वर्षे हे सरकार टिकू शकले नाही. सरकार चालवण्यात आणि दीर्घ पल्ल्याची धोरणे आखण्यात त्यांना अपयश आले असले तरी त्यांनी एक महत्त्वपूर्ण घटनादुरुस्ती त्यांच्या कार्यकाळात केली.

## पुन्हा लोकशाहीच्या वळणावर

ही संविधानातील ४४ वी घटनादुरुस्ती. ही घटनादुरुस्ती केली गेली ती ४२ व्या घटनादुरुस्तीला उत्तर म्हणून. संविधानातील ४२ व्या घटनादुरुस्तीमुळे मूलभूत हक्कांना धक्का लागला होता, न्यायालयांचे अधिकारक्षेत्र कमी झाले होते, मुख्य म्हणजे आणीबाणीमुळे संस्थात्मक हानी झालेली. हे सारे बदलण्यासाठी जनता पक्षाच्या आघाडीने ४४ वी घटनादुरुस्ती मंजूर केली.सर्वांत महत्त्वाचा बदल या दुरुस्तीने केला तो आणीबाणीबाबत. देशांतर्गत अशांतता हे आणीबाणी जाहीर करण्यासाठीचे एक कारण ३५२ व्या अनुच्छेदात होते. हे कारण या दुरुस्तीनुसार रद्द करण्यात आले. सशस्त्र उठाव असल्यास आणीबाणी लागू करता येऊ शकेल; मात्र देशांतर्गत अशांतता निर्माण झाली आहे, या आधारावर नव्हे. तसेच कॅबिनेटने लिखित स्वरूपात आणीबाणीसाठीचा सल्ला दिल्यावरच राष्ट्रपतींना आणीबाणी घोषित करता येईल, असा बदल या दुरुस्तीद्वारे केला



गेला. तसेच आणीबाणीचा प्रस्ताव दोन्ही सभागृहांनी विशेष बहुमताने पारित करणे आवश्यक आहे, हा महत्त्वपूर्ण बदल केला. म्हणजेच अगदी सहज केवळ पंतप्रधानांच्या मर्जीवर आणीबाणीचा निर्णय होऊ नये, यासाठी या तरतुदी केल्या गेल्या. अगदी राज्यांमध्ये लागू केल्या जाणाऱ्या राष्ट्रपती राजवटीसाठीही काही प्रक्रियात्मक बदल या दुरुस्तीद्वारे केला गेला.आणीबाणीच्या काळात सर्व मूलभूत हक्क निलंबित केले जातात. या दुरुस्तीने त्यामध्ये अनुच्छेद २० आणि २१ चा अपवाद जोडला. म्हणजेच अटकेपासून संरक्षणाचा हक्क आणि जगण्याचा हक्क हे हक्क आणीबाणीच्या काळातही निलंबित केले जाणार नाहीत, हा महत्त्वाचा बदल केला गेला. या आणि इतर मूलभूत हक्कांचे रक्षण करतानाच संपत्तीचा हक्क हा मूलभूत हक्क म्हणून रद्द केला. त्यामुळे तो केवळ कायदेशीर हक्क उरला. वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिकांना विधिमंडळांच्या प्रक्रियेबाबत वृत्तांकन करण्याचे स्वातंत्र्य मान्य केले गेले आणि त्यासाठी त्यांना कायदेशीर संरक्षण दिले गेले. आणीबाणीच्या काळात माध्यमांच्या स्वातंत्र्यावरच गदा आल्याने ४४ व्या घटनादुरुस्तीनुसार हा बदल केला गेला. आणीबाणीचे न्यायिक पुनर्विलोकन होऊ शकते. तसेच पंतप्रधान, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकांना न्यायालयात आव्हान देता येऊ शकते. हे आणि या प्रकारचे बदल करत न्यायसंस्थेला त्यांचा मूळ अधिकार या घटनादुरुस्तीने मान्य करून दिला.त्यामुळे आणीबाणीची प्रक्रिया, मूलभूत हक्क आणि न्यायालयांची अधिकारकक्षा या अनुषंगाने मूलभूत बदल करून ४४ व्या घटनादुरुस्तीने

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# फडणवीस लाचार मुख्यमंत्री!

## पालकमंत्रीपदाचा निर्णय बदलताच संजय राऊत यांची टीका

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**महायुतीमधील मंत्र्यांचा शपथविधी होऊन एक महिना लोटल्यानंतर नुकतेच जिल्ह्यांचे पालकमंत्री जाहीर करण्यात आले. मात्र अंतर्गत धुसफूस निर्माण झाल्यानंतर नाशिक आणि रायगड जिल्ह्याचा निर्णय रद्द करण्यात आला. यावरून आता महायुतीमधील अंतर्गत कुरघोडी उघड झाली असून विरोधक त्यावर टीका करत आहेत. शिवसेनेचे (ठाकरे) नेते संजय राऊत यांनी आज प्रसार माध्यमांशी संवाद साधत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली.**



“मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्रीपदाचा निर्णय जाहीर केल्यानंतर त्यात बदल केला. एरवी कडक शिस्त, कठोर निर्णय घेणारे मुख्यमंत्री म्हणून प्रतिमा असलेल्या देवेंद्र फडणवीस यांना स्वतःचाच निर्णय का बदलावा लागला? पालकमंत्रीपदासाठी इतका हौरटपणा का? पालकमंत्रीपदावरून जी दंगल सुरू आहे, ही त्या त्या जिल्ह्यातील आर्थिक उलाढालीवरून सुरू आहे. आर्थिक कारणांवरून ही मारामारी सुरू आहे, त्यात मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपला निर्णय बदलून ते हतबल, लाचार मुख्यमंत्री असल्याचे दाखवून दिले आहे”, अशी टीका संजय राऊत यांनी केली.“दिल्लीने मुख्यमंत्र्यांच्या निर्णयात हस्तक्षेप केला आहे. हे सरकार दिल्लीतून चालेल, असे आम्ही आधीपासून सांगत आलो आहोत. देवेंद्र फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे या कळसुत्री बाहुल्या आहेत आणि त्यांच्या हाता-पायांना बांधलेले दोरे दिल्लीतून नाचवले जातात, हे आज पुन्हा एकदा सिद्ध झालेले आहे. मुख्यमंत्री सरकारचा निर्णय घेऊन राज्यातील गुंडागर्दी, मनमानी मोडण्याचा प्रयत्न करत असताना दिल्ली रस्त्यावर येऊन पालकमंत्रीपदासाठी दंगल करणाऱ्यांच्या बाजूने उभी आहे. पालकमंत्रीपदासाठी दंगल महाराष्ट्राने याआधी पाहिली नव्हती”, अशीही टीका संजय राऊत यांनी केली.राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते छगन भुजबळ यांनी २०१९ साली पहाटे झालेला शपथविधी हे एक षडयंत्र असल्याचे म्हटले होते. तसेच धनंजय मुंडे यांनीही त्यावेळी अजित पवारांना थांबविण्याचा प्रयत्न केल्याचे म्हटले. यावर संजय राऊत यांना प्रश्न विचारला असता ते म्हणाले की, त्यावेळच्या शपथविधीमध्ये जवळपास सर्वच सामील होते. पण तो गुन्हा फसला. आता त्यावर चर्चा करण्यात अर्थ नाही. मुंडे म्हणत आहेत की, त्यावेळी अजित पवारांना थांबिवण्याचा प्रयत्न केला. मग आता का नाही त्यांना थांबविण्याचा प्रयत्न करत. काकांच्या पाठीत खंजीर खुपवत असताना तुम्ही त्यांना थांबवायला हवे होते, असे संजय राऊत म्हणाले.माजी खासदार राहुल शेवाळे यांनी ठाकरे गटाचे आमदार शिंदेंच्या शिवसेनेत येणार असल्याचे विधान केले होते. त्यावर प्रतिक्रिया देताना संजय राऊत म्हणाले की, राहुल शेवाळेंचा आम्ही दारूण पराभव केला. आता ते किती फोडाफोडी करणार? अमित शाह आहेत तोपर्यंत शिंदे गटाचे अस्तित्व आहे. त्यानंतर या लोकांना भविष्य नाही. अमित शाह आहेत, म्हणून निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालय तुम्हाला हवा तसा निकाल देत आहे. बाकी तुमच्याकडे काय आहे? असा सवाल संजय राऊत यांनी विचारला.“मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्रीपदाचा निर्णय जाहीर केल्यानंतर त्यात बदल केला.

### अजित पवारांना का थांबवलं नाही

एरवी कडक शिस्त, कठोर निर्णय घेणारे मुख्यमंत्री म्हणून प्रतिमा असलेल्या देवेंद्र फडणवीस यांना स्वतःचाच निर्णय का बदलावा लागला? पालकमंत्रीपदासाठी इतका हौरटपणा का? पालकमंत्रीपदावरून जी दंगल सुरू आहे, ही त्या त्या जिल्ह्यातील आर्थिक उलाढालीवरून सुरू आहे. आर्थिक कारणांवरून ही मारामारी सुरू आहे, त्यात मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपला निर्णय बदलून ते हतबल, लाचार मुख्यमंत्री असल्याचे दाखवून दिले आहे”, अशी टीका संजय राऊत यांनी केली.“दिल्लीने मुख्यमंत्र्यांच्या निर्णयात हस्तक्षेप केला आहे. हे सरकार दिल्लीतून चालेल, असे आम्ही आधीपासून सांगत आलो आहोत. देवेंद्र फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे या कळसुत्री बाहुल्या आहेत आणि त्यांच्या हाता-पायांना बांधलेले दोरे दिल्लीतून नाचवले जातात, हे आज पुन्हा एकदा सिद्ध झालेले आहे. मुख्यमंत्री सरकारचा निर्णय घेऊन राज्यातील गुंडागर्दी, मनमानी मोडण्याचा प्रयत्न करत असताना दिल्ली रस्त्यावर येऊन पालकमंत्रीपदासाठी दंगल करणाऱ्यांच्या बाजूने उभी आहे. पालकमंत्रीपदासाठी दंगल महाराष्ट्राने याआधी पाहिली नव्हती”, अशीही टीका संजय राऊत यांनी केली.

---

# बार्शीतील वाघाचे भय संपेना!

## महिन्यानंतरही वाघ मोकाट, जनावरांची शिकार सुरूच

।सोलापूर।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यासह शेजारच्या धाराशिव जिल्ह्याच्या सीमेवर रामलिंग अभयारण्य व आसपासच्या गावांमध्ये जनावरांची मोठ्या प्रमाणावर शिकार करून दहशत बसविलेल्या वाघाचा महिना उलटून गेला तरी अद्याप शोध लागला नाही.**

चंद्रपूर येथील शीघ्र बचाव पथकाने मागील आठवड्यापासून वाघाला जेरबंद करण्यासाठी मोहीम सुरू केली असली तरी दुसरीकडे वाघाकडून जनावरांवरील हल्ल्याचे सत्र सुरूच आहे. वन विभागानेही वाघाच्या शोध मोहिमेबाबत कमालीची गुप्तता पाळल्यामुळे या शोध मोहिमेचे नेमके काय चालले आहे, हे स्पष्ट होत नाही.यवतमाळ जिल्ह्यातील टिपेश्वर व्याघ्र अभयारण्यातून तब्बल ५०० किलोमीटर अंतर दूर सोलापूर जिल्ह्यातील बार्शी व धाराशिवच्या येडशी भागात भटकत आलेला वाघ गेल्या ३६ दिवसांपासून दहशत माजवत आहे. दुसरीकडे बिबट्यांनीही गेल्या अनेक दिवसांपासून बार्शी भागातच नव्हे, तर करमाळा, माढा, मोहोळ, उत्तर सोलापूर धुमाकूळ घातला आहे. बिबट्यांचे दररोज कोठे ना कोठे दर्शन घडत आहे.



सोलापूर शहराच्या हद्दवाढ भागात बाळे परिसरासह नजीकच्या मार्डी व अन्य गावांच्या शिवारातही बिबट्यांचा वावर वाढला आहे. या बिबट्यांना जेरबंद करण्याचा विषय वन विभागांच्या पटलावर अद्याप आला नाही. दोन वर्षांपूर्वी करमाळा तालुक्यात बिबट्याने धुमाकूळ घालून जनावरांबरोबरच चार माणसांचेही बळी घेतले होते. तेव्हा अखेर त्या नरभक्षक वाघाला गोळ्या घालून ठार मारण्यात आले होते.या पार्श्वभूमीवर आता जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये बिबट्यांचा उपद्रव पुन्हा वाढला आहे. जिल्ह्यात सध्या नेमका किती बिबट्यांचा वावर आहे, यांची माहिती वन खात्याकडून उघड होत नाही. या पार्श्वभूमीवर बिबट्यांपाठोपाठ आता बार्शी परिसरात वाघानेही मागील ३६ दिवसांपासून धुमाकूळ घातला.

### वाघाला जेरबंद करण्यासाठी मोहीम

वाघाचे वास्तव असलेल्या आकाराने छोटा असलेला रामलिंग अभयारण्य आहे. चंद्रपूर येथील शीघ्र बचाव पथकाने मागील आठवड्यापासून बार्शी व येडशी परिसरात वाघाला जेरबंद करण्यासाठी मोहीम चालविली आहे. निष्णात आणि तज्ज्ञ अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या या बचाव पथकात ५० पेक्षा अधिक मनुष्यबळ कार्यरत आहे. वाघाचा ठावठिकाणा लागण्यासाठी पावलांचे ठसे शोधून वाघाचा माग काढला जात आहे. एकीकडे पावलांचे ठसे शोधले जात असताना दुसरीकडे प्रत्यक्ष वाघ आसपासच्या काही गावांमध्ये नागरी वस्त्यांजवळ जनावरांची शिकार करीत आहे. दररोज २० ते २५ किलोमीटर परिसर शीघ्र बचाव पथक वाघाच्या शोधात भटकत आहे. पायाचे ठसे काही भागात सापडतात.

# एक लग्न अन् 17 अंत्यसंस्कार!

## जम्मूतील गावात रहस्यमय आजार; 3 कुटुंबे उद्ध्वस्त

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जम्मू काश्मीरमधील बद्दल हे गाव एका वेगळ्याच भीतीच्या छायेत आहे. कारण, या गावातील माणसं दिवसागणिक मृत होत आहेत. ७ डिसेंबरपासून आतापर्यंत १७ लोकांचा मृत्यू झाला असून या मृत्यूचं कारण अद्याप समजू शकलेलं नाही. त्याकरता केंद्र सरकारने आंतर मंत्रालयीन समिती तयार केली आहे. तर देशातील सर्वोच्च वैद्यकीय संस्थांतील तज्ज्ञही या मृत्यूमागच्या कारणांचा शोध घेण्यासाठी प्रयत्न करत आहेत. यास्मीन कौसर (१५) या चिमुकल्या मुलीचा आता नुकताच मृत्यू झालाय. तिच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याकरता तिचे वडील मुश्ताक अहमद (३५) आणि आजोबा जमाल दिन (६५) कबर खोदण्यासाठी मदतीची वाट पाहत आहेत. या कामासाठी १०-१२ जण आवश्यक आहेत.**



मात्र, गावात पसरलेल्या रहस्यमय आजारामुळे गावातील लोक घराबाहेर पडायलाही घाबरत आहेत. करोनोपेक्षाही भयंकर अवस्था या गावात झाली आहे. हे माझे आजोबा आहेत. पण आम्ही एकमेकांच्या घरी जाऊन ना पाणी पित आणि नाही जेवू शकत आहोत", अशी तेथील सद्यस्थिती मुश्ताक यांनी सांगितली. मुश्ताक यांनी त्यांच्या मावशी, मामा आणि त्यांच्या घरातील पाच मुलांना आतापर्यंत या आजारामुळे गमावलं आहे. एका महसूल अधिकाऱ्याने द इंडियन एक्स्प्रेसला सांगितले की, "मृत्यू कशामुळे झाला हे शोधण्यासाठी चौकशी सुरू आहे. त्यामुळे या काळात प्रशासनाने ग्रामस्थांना सध्या कोणतेही सामुदायिक मेळावे आयोजित न करण्याचे आदेश दिले आहेत." तसंच, या गावातील ठरलेली लग्न सोहळेही पुढे ढकलण्यात आल्याचं येथील गावकऱ्यांनी सांगितलं. सोमवारी गृहमंत्री अमित शहा यांच्या आदेशानुसार स्थापन करण्यात आलेल्या पथकाने राजौरी जिल्हा मुख्यालयापासून ६० किलोमीटर अंतरावर असलेल्या गावाला भेट दिली आणि मृतांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. अधिकाऱ्यांनी तेथील विहिर बंद करण्याचे आदेश दिले आहेत. या विहिरीत किटकनाके असण्याची शक्यता हे. हेच पाणी येथे वापरले गेल्याचा संशय आहे.

दरम्यान, देशातील सर्वोच्च वैद्यकीय संस्थांतील तज्ज्ञ चंदीगडचे PGIMER, पुण्यातील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजी आणि दिल्लीतील राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्राने गावाला भेट दिली. या संस्थांनी येथील पाणी आणि अन्नाचे नमुने तपासले आहेत. जम्मू आणि काश्मीर सरकारला दिलेल्या त्यांच्या अहवालात, तज्ञांनी सांगितले होते की मृत्यू झालेल्यांच्या नमुन्यांमध्ये काही न्यूरोटॉक्सिन आढळले आहेत. "हे मृत्यू स्थानिकीकृत असल्याचे आढळून आले आणि संभाव्यत: काही महामारीविषयक संबंध आहेत",गावकरी फझल हुसैन यांची मुलगी सुलताना हिच्या लग्नासाठी सर्व जमले होते. तेव्हापासून सगळे आता कोणाच्या तरी अंत्यविधीसाठी जमत आहेत. या रहस्यमय घटनेत फझल हुसैन, मोहम्मद अस्लम आणि मोहम्मद रफिक या तीन कुटुंबातील सदस्यांचा समावेश आहे.सुलतानाचं लग्न झाल्यानंतर काही दिवसांनी फजल आणि त्याची चार मुले आजारी पडली. वैद्यकीय सुविधेत आणि नंतर राजौरी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात नेण्यात आले.

### खातमानंतरही अनेकांचा मृत्यू

फजलचा वाटेतच मृत्यू झाला तर दुसऱ्या दिवशी त्याच्या मुलांचा मृत्यू झाला. मोहम्मद रफिकच्या कुटुंबातील चार सदस्य, त्यांची गर्भवती पत्नी, दोन मुलगे आणि एक मुलगी अशाच लक्षणांसह हॉस्पिटलमध्ये दाखल झाले होते. त्यांना सुरुवातील सौम्य ताप येऊन ते बेशुद्ध पडले. उपचारादरम्यान चौघांचाही मृत्यू झाला. गावकऱ्यांनी सांगितले की, रफिक आणि फजल हे एकमेकांचे नातेवाईक असून सुलतानाच्या लग्नात या दोघांचेही कुटुंब हजर होतं. त्यामुळे सुरुवातीला डॉक्टरांना अन्नातून विषबाधा झाल्याचा संशय होता.पण एक महिन्याहून अधिक काळ उलटून गेल्यानंतरही त्याच गावातील आणखी लोकांना तत्सम लक्षणांसह रुग्णालयात आणण्यात आले आणि त्यांचाही अशाच परिस्थितीत मृत्यू झाला. त्यामुळे या मृत्यूमागचे रहस्य अधिक गडद होत गेलं. त्यावेळी काही गावकऱ्यांनी सांगितलं की, फजलच्या घरी मृत्यू झाल्यानंतर ४० दिवसांनी त्यांच्या घरी खातम (शोक समाप्त करण्यासाठी) झाली होती. तेथेही काही उपस्थित ग्रामस्थांनी भोजन केलं होतं. त्या भोजनात गावकऱ्यांना पॅकेटमध्ये गोड भात मोहम्मद युसूफ आणि मोहम्मद अस्लम यांच्या घरी पाठवण्यात आला होता.

---

# इस्रायल आणि हमासमध्ये पसरली शांतता

## म्यानमारच्या राखीन भागात हवाई हल्ल्यात 28 जणांचा मृत्यू

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**म्यानमारच्या पश्चिम राखीन भागात झालेल्या हवाई हल्ल्यात 28 जणांचा मृत्यू झाला असून 25 जण गंभीर जखमी झाले आहेत. हा हल्ला अरकान आर्मी आणि म्यानमार लष्कर यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाचा एक भाग आहे. या हल्ल्याने पश्चिम राखीन प्रांतातील परिस्थिती अधिकच चिघळली आहे.**



अरकान आर्मी हा म्यानमारमधील एक बंडखोर गट आहे जो राखीन प्रांतावर नियंत्रण मिळवण्यासाठी म्यानमार लष्कराशी संघर्ष करत आहे. गेल्या वर्षभरात या गटाने राखीन प्रांतातील अनेक भाग ताब्यात घेतले आहेत. अरकान आर्मीने हल्ल्यात मृत आणि जखमी झालेल्या लोकांमध्ये म्यानमार सैनिकांच्या कुटुंबीयांचा समावेश असल्याचे सांगितले आहे. म्यानमारच्या लष्कराने यापूर्वी 9 जानेवारी रोजी राखीनमधील एका गावावर हवाई हल्ला केला होता. या हल्ल्यात किमान 40 जण ठार आणि 20 जण जखमी झाले होते. रामरी बेटावर अरकान आर्मीच्या ताब्यात असलेल्या क्याौक नी माव गावावर हा हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात शेकडो घरे जळून खाक झाली होती, आणि स्थानिक लोकांनी आपले घरदार सोडून पळ काढला होता. राखीन प्रांत हा भू-राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा प्रांत आहे, जो बांगलादेशच्या 271 किमी लांब सीमेशी जोडलेला आहे. भारत आणि म्यानमारच्या 1,643 किमी लांब सीमेलाही हा प्रांत लागून आहे. या सीमेच्या म्यानमारकडील भागावर लष्कराशिवाय विविध वांशिक सशस्त्र गटांचे नियंत्रण आहे. जागतिक घडामोडी संबंधित बातम्या वाचण्यासाठी येथे क्लिक करा : डोनाल्ड ट्रम्प यांचा पहिलाच दिवस ठरणार ऐतिहासिक; 200 फेब्रुवारी 2021 मध्ये म्यानमारच्या लष्कराने लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या सरकारला उलथून टाकले होते. त्यानंतर देशात मोठ्या प्रमाणावर हिंसाचार आणि संघर्ष सुरू झाला. लष्कराच्या दडपशाहीला विरोध करणारे नागरिक आता सशस्त्र बंडखोर गटांमध्ये सामील होत आहेत, ज्यामुळे संघर्ष अधिक तीव्र झाला आहे.

### जागतिक पातळीवरील चिंता

जगभरातील शांतता प्रिय देशांनी म्यानमारमधील वाढत्या हिंसाचार आणि मानवी हक्कांच्या उल्लंघनाबाबत चिंता व्यक्त केली आहे. विशेषतः इस्रायल आणि हमास यांच्यात युद्ध संपवण्याचा करार झाल्यानंतर, म्यानमारमधील संघर्षाने आंतरराष्ट्रीय पटलावर पुन्हा लक्ष वेधले आहे.राखीनमधील या हिंसाचारामुळे अनेक नागरिक बेघर झाले आहेत. घरांसोबत जीवनाचे साधनही उद्ध्वस्त झाले आहे. मानवी संकटाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे.

# महाकरंडक स्पर्धेत 'सखा' एकांकिकेने मिळवला प्रथम मान

महाराष्ट्राची सगळ्यात मोठी आणि मानाची एकांकिका स्पर्धा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'अहिल्यानगर महाकरंडक २०२५' या एकांकिका स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ आज सावेडीतील माऊली सभागृहात उत्साहात झाला. ही स्पर्धा १६ ते १९ जानेवारी या कालावधीत झाली. या स्पर्धेत 'सखा' एकांकिकेने अहिल्यानगर महाकरंडक' पटकावला. तर अनिल आव्हाड (गुडबाय किस) सर्वोत्कृष्ट अभिनेता, संस्कृती पवार (सेक्स ऑन व्हिल्स) सर्वोत्कृष्ट अभिनेत्री ठरली.पारितोषिक समारंभाच्या वेळी आमदार संग्राम जगताप, आमदार सत्यजित तांबे, सुप्रसिद्ध दिग्दर्शक उमेश शुक्ला, परीक्षक, अभिनेता आणि दिग्दर्शक प्रवीण तरडे, निर्माता आणि दिग्दर्शक आशिष वाघ, दिग्दर्शक आणि एडिटर मयूर हरदास, अहिल्यानगर महाकरंडक स्पर्धेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, स्पर्धेचे संयोजक स्वप्नील मुनोत, महावीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष हर्षल बोरा आदींची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेच्या वेळी शिवकालीन पुरातन नाणी, शिवकालीन शस्त्र आणि वस्तू यांचे प्रदर्शन देखील होते. यानिमित्ताने रंगकर्मींना आणि स्पर्धेला भेट देणाऱ्यांना छत्रपती



शिवाजी महाराजांच्या काळातील दुर्मिळ वस्तू पाहायला मिळाल्या. स्पर्धेत प्रथम येणाऱ्या संघास १ लाख ५१ हजार १११ रुपये रोख, अहिल्यानगर महाकरंडक आणि प्रमाणपत्र असे पारितोषिक देण्यात आले.मागील ११ वर्षांपासून 'अहमदनगर महाकरंडक' नावाने प्रसिद्ध असणारी ही स्पर्धा जिल्ह्याचे नाव 'अहिल्यानगर' असे बदलल्याने आता 'अहिल्यानगर महाकरंडक' नावाने ओळखली जाणार आहे. यंदाचं स्पर्धेचं हे १२वे वर्ष होते. मागील एका तपात ही स्पर्धा राज्यातील सर्वात मोठी मानाची एकांकिका स्पर्धा म्हणून नाट्य वर्तुळात ओळखली जाते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाला ३५१ वर्षे पूर्ण झाल्या निमित्त या एकांकिका स्पर्धेचं यंदाचं 'उत्सव रंगभूमीचा, सोहळा शिवराज्याभिषेकाचा' हे ब्रीदवाक्य होते.

## सैफ अली खानवर हल्ला कसा केला?

सैफ अली खानवर हल्ला करणाऱ्या आरोपीला रविवारी अटक करण्यात आली. सैफच्या घरात चोरीच्या उद्देशाने घुसलेल्या शरीफुल इस्लाम शेहजाद मोहम्मद रोहिल्ला अमीन फकीर उर्फ विजय दास नावाच्या या आरोपीने केलेल्या हल्ल्यात सैफ गंभीर जखमी झाला होता. आरोपीने सैफच्या पाठीवर चाकूने वार केले होते. चाकूचे एक टोक सैफच्या पाठीत घुसले होते. आरोपीने सैफवर हल्ला कसा केला, त्याबद्दल माहिती समोर आली आहे. एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, हल्ल्यानंतर घुसखोर सैफच्या फ्लॅटमधून पळून गेला आणि सुमारे दोन तास इमारतीच्या बागेत लपून बसला होता. सैफला रक्तबंबाळ अवस्थेत लिलावती रुग्णालयात नेण्यात आलं होतं, तिथे डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करून त्याच्या पाठीतून चाकूचा तुकडा काढला होता.

## प्रियांकाने घेतले तिरुपतीचे दर्शन

बॉलीवूडपासून हॉलीवूडपर्यंतचा यशस्वी प्रवास करणारी अभिनेत्री प्रियांका चोप्रा सध्या हैदराबादमध्ये आहे. ती एसएस राजामौली यांच्या आगामी चित्रपटात काम करणार अशा चर्चा आहेत. तिने आज हैदराबादच्या जवळ असणाऱ्या चिलकूर बालाजी मंदिर येथे जाऊन दर्शन घेतले. यासह तिने दाक्षिणात्य अभिनेता राम चरणच्या पत्नीचेही आभार मानले. प्रियांका चोप्राने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर अनेक फोटो शेअर केले आहेत, ज्यामध्ये ती पांढऱ्या रंगाच्या सलवार सूटमध्ये, नो-मेकअप लूकसह दिसत आहे. तिने डोक्यावर ओढणी घेतली असून आणि कपाळावर गंध लावला आहे.प्रियांका चोप्राने या फोटोंसह कॅप्शनमध्ये लिहिले, "श्री बालाजींच्या आशीर्वादाने एका नवीन अध्यायाला सुरुवात होत आहे. आपल्यातील प्रत्येकाच्या हृदयात शांतता, समृद्धी नांदो. देवाची कृपा असीम आहे. ॐ नमो नारायणाय." तिने आपल्या पोस्टमध्ये राम चरणच्या पत्नी उपासना कामिनेनीचेही आभार मानले आहेत. यापूर्वी प्रियांका चोप्रा महाकुंभात सहभागी झाली आहे अशी अफवा पसरली होती . खरंतर, तिने इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला होता, ज्यामुळे अनेकांना तो व्हिडीओ की तो प्रयागराजमधील आहे असे वाटले होते.



## लीला-एजेने पाणीपुरीवर मारला ताव

'झी मराठी' वाहिनीवरील सध्या लोकप्रिय मालिकांपैकी एक म्हणजे 'नवरी मिळे हिटलरला'. अभिनेता राकेश बापट आणि अभिनेत्री वल्लरी विराज यांची प्रमुख भूमिका असलेल्या या मालिकेने अल्पावधीत प्रेक्षकांच्या मनात स्थान निर्माण केलं आहे. राकेशने साकारलेला AJ (अभिराम जहागीरदार) व वल्लरीने साकारलेली लीला प्रेक्षकांच्या चांगलीच पसंतीस पडली आहे. दोघांची जोडी प्रेक्षकांना आवडू लागली आहे. तसंच मालिकेच्या कथानकाने प्रेक्षकांच्या चांगलंच खिळवून ठेवलं आहे. 'नवरी मिळे हिटलरला' मालिकेची दिवसेंदिवस लोकप्रियता वाढताना दिसत आहे. सध्या सोशल मीडियावर लीला-एजेचा सेटवरील व्हिडीओ व्हायरल झाला आहे.'नवरी मिळे हिटलरला' मालिकेतील कलाकार नेहमी चर्चेत असतात. हे कलाकार सोशल मीडियावर खूप सक्रिय असतात. सेटवरील डान्स व्हिडीओ, मजेशीर व्हिडीओ शेअर करत असतात. अलीकडेच वल्लरी विराजने सेटवरील एक व्हिडीओ इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केला होता; जो सध्या खूप चर्चेत आला आहे. अभिनेत्री वल्लरी विराजने शेअर केलेल्या या व्हिडीओमध्ये 'नवरी मिळे हिटलरला'च्या सेटवर अनेक चाट पदार्थ पाहायला मिळत आहेत. पाणीपुरी, वडा, समोसा, ढोकळा, वेफर्स, जिलबी असे पदार्थ दिसत आहेत. यावेळी लीला-एजे म्हणजेच वल्लरी विराज आणि राकेश बापट पाणीपुरीवर ताव मारताना पाहायला मिळत आहेत. दोघांच्या या व्हिडीओने लक्ष वेधून घेतलं.

## ट्रोलर्सना हसतमुखाने सामोरी जाणारी बहुरंगी

वर्ष होतं २०१२...करण जोहरच्या लाडक्या 'स्टुडंट'ने बॉलीवूडमध्ये 'हिरोईन' म्हणून पदार्पण केलं. घरातच लाभलेला अभिनयाचा वारसा, सिनेविश्वात नाव कमावलेली बहीण, दिग्दर्शक वडील अन् गॉडफादर करण जोहर. या चौकटीमुळे तिच्या पहिल्याच सिनेमावर 'नेपोकिड', 'घराणेशाही'चा ठपका बसला अन् इथूनच आलिया भट्टचा 'शानदार' अभिनेत्री होण्याचा प्रवास सुरू झाला. गेल्या 13 वर्षांत प्रचंड मेहनत करून तिने प्रेक्षकांना नेपोटिझमचा 'कलंक' पुसायला 'राझी'केलं आणि बॉलीवूडची 'संघर्ष' करणारी खरी 'गंगूबाई' मीच आहे हे ठासून सांगितलं. 'हायवे' असो किंवा 'उडता पंजाब' आलियाचा हिरोईन ते अभिनेत्री होण्याचा प्रवास थक्क करणारा होता. अभिनयाची आवड, जिद्द आणि कामाप्रती असलेलं प्रेम या सगळ्याचा उत्तम मेळ साधल्यामुळे 2012 मध्ये स्क्रीनवर दिसणाऱ्या अवखळ 'शनाया'चं रुपांतर समंजस अशा 'राणी चॅटर्जी'मध्ये कधी होऊन गेलं हे समजलंच नाही.पहिलाच चित्रपट प्रदर्शित झाल्यावर आलियाने सगळ्या टीमबरोबर 'कॉफी विथ करण'मध्ये उपस्थिती लावली होती. यावेळी भारताचे राष्ट्रपती कोण आहेत? असा प्रश्न करणने विचारला असता आलियाने अतिउत्साहाने चुकीचं उत्तर दिलं होतं आणि इथूनच सुरू झालं ट्रोलिंग... पुरस्कार सोहळे असो किंवा पत्रकार परिषद आलियाला सर्वत्र सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्न विचारले जाऊ लागले. या सगळ्या प्रसंगांचा सामना देखील अभिनेत्रीने मोठ्या धीराने केला. ट्रोलर्सला हसत-हसत उत्तर देऊन तिने सकारात्मकतेने प्रत्येकाच्या मनात एक वेगळी जागा निर्माण केली.



# जोकोव्हिचची चमकदार कामगिरी!

## रोमहर्षक सामन्यात केला कार्लोस अल्काराझचा पराभव

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ऑस्ट्रेलियन खुल्या ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेतील आपली चमकदार कामगिरी नोव्हाक जोकोविचने कायम ठेवली आहे. मंगळवारी झालेल्या रोमहर्षक क्वार्टर फायनलमध्ये नोव्हाक जोकोव्हिचने त्याचा पारंपरिक प्रतिस्पर्धी आणि स्पेनचा युवा टेनिसपटू कार्लोस अल्काराझचा पराभव केला आहे. मंगळवारी झालेल्या सामन्यात ( AUSTRALIAN OPEN 2025 QF ) जोकोव्हिचने कार्लोसला 4-6, 6-4, 6-3, 6-4 अशा सेटमध्ये हरवलं. पहिल्या सेटमध्ये जोकोविचला कार्लोसने हरवलं होतं. पण त्यानंतर जोकोव्हिचने दमदार पुनरागमन करत सलग तीन सेट जिंकले आणि उपांत्य फेरीत धडक मारली.**



जोकोविच आणि अल्काराझ यांच्यातला हा सामना सुमारे साडेतीन तास चालला. अत्यंत कठीण वाटणाऱ्या या सामन्यावर जोकोव्हिचने आपलं नाव कोरलं. दुखापतीमुळे जोकोव्हिच या सामन्यातून माघार घेणार की काय अशी साशंकता होती. मात्र चिवट खेळाचा प्रत्यय घडवत जोकोव्हिचने संस्मरणीय विजयाची नोंद केली. नोव्हाक जोकोव्हिचची या स्पर्धेतली ही पन्नासावी क्वार्टर फायनल मॅच होती.

आता उपांत्य फेरीत त्याचा सामना जर्मनीच्या आलेक्झांडर झरेव्हशी होणार आहे.१२ व्यांदा सेमी फायनल स्पर्धेत जोकोव्हिचने धडक मारली आहे. ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेत९९ व्या विजयावर त्याने आपलं नाव कोरलं आहे. तसंच २५ व्या ग्रँड स्लॅम जेतेपदाच्या दिशेने महत्त्वपूर्ण वाटचाल केली. जोकोव्हिच सामना जिंकल्यावर म्हणाला, आजचा सामना जर अंतिम सामना असता तर किती बरं झालं असतं. या कोर्टवर मी खेळलेल्या आणि इतर कुठल्याही ठिकाणी खेळलेल्या मोठ्या सामन्यांप्रमाणेच आजचा हा टेनिसचा सामना होता, असंही त्याने म्हटलं आहे.जोकोव्हिच आणि जर्मनीचा खेळाडू अलेक्झांडर झरेव्ह या दोघांचा सामना २४ जानेवारी रोजी होणार आहे. टेनिस विश्वातही आजची क्वार्टर फायनल जिंकून नोव्हाक जोकोव्हिचने त्याचा दबदबा कायम ठेवला आहे. जोकोव्हिचला ऑस्ट्रेलियन ओपनचा बादशहा मानलं जातं. त्याने पुरुष एकेरी स्पर्धेत १० वेळा ऑस्ट्रेलियन ओपनचं जेतेपद पटकावलं आहे. त्याच्यानंतर नाव येतं ते सेरेना विल्यम्सचं. सेरेना सातवेळा जेतेपदाची मानकरी ठरली आहे. अल्काराझविरोधातला जोकोव्हिचचा आजचा सामना खडतर होता. मात्र त्याने संघर्षमय विजय मिळवत सेमी फायनलमध्ये धडक मारली आहे.नोव्हाक जोकोव्हिचची या स्पर्धेतली ही पन्नासावी क्वार्टर फायनल मॅच होती. आता उपांत्य फेरीत त्याचा सामना जर्मनीच्या आलेक्झांडर झरेव्हशी होणार आहे.१२ व्यांदा सेमी फायनल स्पर्धेत जोकोव्हिचने धडक मारली आहे. ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेत ( AUSTRALIAN OPEN 2025 QF ) ९९ व्या विजयावर त्याने आपलं नाव कोरलं आहे. तसंच २५ व्या ग्रँड स्लॅम जेतेपदाच्या दिशेने महत्त्वपूर्ण वाटचाल केली. जोकोव्हिच सामना जिंकल्यावर म्हणाला, आजचा सामना जर अंतिम सामना असता तर किती बरं झालं असतं. या कोर्टवर मी खेळलेल्या आणि इतर कुठल्याही ठिकाणी खेळलेल्या मोठ्या सामन्यांप्रमाणेच आजचा हा टेनिसचा सामना होता, असंही त्याने म्हटलं आहे.जोकोव्हिच आणि जर्मनीचा खेळाडू अलेक्झांडर झरेव्ह या दोघांचा सामना २४ जानेवारी रोजी होणार आहे. ऑस्ट्रेलियन खुल्या ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेतील आपली चमकदार कामगिरी नोव्हाक जोकोविचने कायम ठेवली आहे. मंगळवारी झालेल्या रोमहर्षक क्वार्टर फायनलमध्ये नोव्हाक जोकोव्हिचने त्याचा पारंपरिक प्रतिस्पर्धी आणि स्पेनचा युवा टेनिसपटू कार्लोस अल्काराझचा पराभव केला आहे.

### जोकोव्हिचचा दबदबा कायम

जोकोव्हिचने दमदार पुनरागमन करत सलग तीन सेट जिंकले आणि उपांत्य फेरीत धडक मारली.जोकोविच आणि अल्काराझ यांच्यातला हा सामना सुमारे साडेतीन तास चालला. अत्यंत कठीण वाटणाऱ्या या सामन्यावर जोकोव्हिचने आपलं नाव कोरलं. दुखापतीमुळे जोकोव्हिच या सामन्यातून माघार घेणार की काय अशी साशंकता होती. मात्र चिवट खेळाचा प्रत्यय घडवत जोकोव्हिचने संस्मरणीय विजयाची नोंद केलीऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धे९९ व्या विजयावर त्याने आपलं नाव कोरलं आहे. जोकोव्हिच सामना जिंकल्यावर म्हणाला, आजचा सामना जर अंतिम सामना असता तर किती बरं झालं असतं. या कोर्टवर मी खेळलेल्या आणि इतर कुठल्याही ठिकाणी खेळलेल्या मोठ्या सामन्यांप्रमाणेच आजचा हा टेनिसचा सामना होता, असंही त्याने म्हटलं आहे.जोकोव्हिच आणि जर्मनीचा खेळाडू अलेक्झांडर झरेव्ह या दोघांचा सामना २४ जानेवारी रोजी होणार आहे.

# भारताच्या वैष्णवी शर्माची चमकदार कामगिरी

## पदार्पणात 5 विकेट अन् हॅटट्रिक घेणारी पहिली भारतीय

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताच्या महिला संघाने १९ वर्षांखालील टी-२० विश्वचषकात आपल्या कामगिरीने सर्वांचं लक्ष वेधलं आहे. भारतीय संघाने दोन सामने जिंकत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. भारताने मलेशिया संघाला ३२ धावांत ऑल आऊट करत प्रत्युत्तरात १७ चेंडूत सामना जिंकला. भारताच्या या विजयाची खरी मॅचविनर ठरली भारताची फिरकीपटू वैष्णवी शर्मा.**




भारताच्या वैष्णवी शर्माने भारताकडून मलेशियाविरूद्धच्या सामन्यात पदार्पण केले. वैष्णवीने पदार्पणाच्या सामन्यातच टी-२० मध्ये ५ विकेट्स घेतले आणि त्याहूनही मोठी गोष्ट म्हणजे तिने या सामन्यात हॅटट्रिकही घेतली. पदार्पणाच्या सामन्यात ५ विकेट्स आणि हॅटट्रिक घेणारी वैष्णवी ही पहिली भारतीय महिला क्रिकेटपटू ठरली आहे. मलेशियाविरुद्ध हॅटट्रिक घेत आपल्या गोलंदाजीने सर्वांचं लक्ष वेधून घेणारी वैष्णवी ही ग्वाल्हेरची रहिवासी आहे. वैष्णवीचे घर ग्वाल्हेरच्या चंबळ भागात आहे आणि भारतीय संघात स्थान मिळवणारी ती या ठिकाणची एकमेव महिला क्रिकेटर आहे. वैष्णवी शर्मा ही डावखुरी फिरकी गोलंदाज आहे. वैष्णवीला लहानपणापासूनच क्रिकेट खेळण्याची खूप आवड होती. आपल्या मुलीला क्रिकेटच्या जगात यशस्वी करण्यासाठी वडिलांनी खूप मेहनत घेतली. वैष्णवीचे वडील, व्यवसायाने ज्योतिषी आहेत, त्यांनी चंबळमध्ये प्रशिक्षणाच्या चांगल्या सुविधा नसल्यामुळे आपल्या मुलीला ग्वाल्हेरच्या तानसेन क्रिकेट अकादमीमध्ये दाखल केले. या अकादमीत पाऊल ठेवत वैष्णवीने क्रिकेटचे धडे गिरवले. वैष्णवीने लहानपणापासूनच क्रिकेटच्या मैदानावरील आपली चुणूक दाखवली.

### मलेशियाचे फलंदाज फेल ठरले

२०१७ मध्ये वैष्णवीकडे मध्य प्रदेशच्या १६ वर्षांखालील संघाची धुराही सोपवण्यात आली होती. यानंतर वैष्णवीने मागे वळून पाहिले नाही. २०२२ मध्ये, वैष्णवीने तिच्या गोलंदाजीने खूप नाव कमावले आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट्स घेतल्या.२०२२-२३ मध्ये ज्युनियर महिला क्रिकेटमध्ये केलेल्या दमदार कामगिरीबद्दल वैष्णवीला बीसीसीआयने दालमिया पुरस्कारानेही सन्मानित केले. वैष्णवीसमोर १९वर्षांखालील टी-२० वर्ल्डकप सामन्यात मलेशियाचे फलंदाज पूर्णपणे फेल ठरले.